वनपरिक्षेत्रामध्ये जाळरेषा रोखणार जंगलात लागलेल्या वणव्याची धग

■ महासागर प्रतिनिधी,

मारेगाव, दि. २० : तालुक्यात वनक्षेत्र आणि डोंगररांगांची संख्या जास्त असून त्याठिकाणी वनसंपदाही मोठ्या प्रमाणात आहे. मात्र, दरवर्षी वणव्यात या वनसंपदेला हानी पोहोचते. वृक्ष, प्राणी आणि पक्ष्यांची आश्रयस्थाने तसेच सरपटणारे जीव वणव्याच्या भक्ष्यस्थानी पडून मोठी हाणी होते. या वर्षी वणव्याची ही धग रोखण्यासाठी वन विभागाने सूक्ष्म नियोजन केले आहे. तालुक्यात २ हजार ५०० हेक्टर वनक्षेत्रात जाळरेषा आखली जात आहे.

मारेगाव तालुक्यात वनक्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. विविध भागातील वनहद्दीत गड तसेच डोंगररांगा व माळरान आहेत. या डोंगरांना उन्हाळ्यात वनवा लागून मोठ्या प्रमाणात जीवित व आर्थिक नुकसान होते. हा वणवा आटोक्यात आणण्यासाठी वन विभागाने यावर्षी उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच जाळरेषा आखण्याचे काम हाती घेतले आहे. तब्बल २ हजार ५०० हेक्टर वनक्षेत्रात जाळरेषा आखली जात असल्यामुळे वनक्षेत्र व डोंगरावरील वणवा आटोक्यात येण्यास हातभार लागणार आहे. वन हद्दीपासून ५ फुट नागरी वस्तीच्या दिशेने सर्व वनक्षेत्र आणि डोंगरांच्या कडांवर ही जाळरेषा काढली जात आहे. त्यामुळे वनक्षेत्रातील, डोंगरावरील औषधी वनस्पती, इतर वृक्ष, सरपटणारे प्राणी, वन्यप्राणी आणि पक्ष्यांची आश्रयस्थाने वाचवण्यात यश येण्याची अपेक्षा वन विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. बोटोनी राउंडमध्ये २,५००, हेक्टर क्षेत्र वन विभागाच्या हद्दीत येते. या वनात सांग, खैर, बांबू अशी मौल्यवान आणि वनौषधी वृक्ष आहेत. सोबतच मोठ्या प्रमाणात मोर, ससा, वाघ, हरीण, निलगाय, कोल्हा आदी वन्य प्राणी व पक्षी यांचे वास्तव आहे. वनाला लागणाऱ्या आगीने या प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात येत असते. यांच्या रक्षणासाठी वन विभागातर्फे काळजी घेतली जात असते.

वणवा लावणाऱ्यास शिक्षेची तरतूद वणवा लावताना कोणी सापडल्यास अथवा वनवा लावल्याचे पुरावे मिळाल्यास वनवा लावणाऱ्यावर थेट फौजदारी गुन्हा दाखल होतो. त्यामध्ये शिक्षेचीही तरतूद आहे. वनसंपत्तीचे जास्त नुकसान झाल्यास जास्त शिक्षा व दंड होवू शकतो.

शेतीचा बांध जाळताना माहिती द्या वनात फिरायला जाताना अग्निजन्य वस्तू घेऊन जाऊ नका. डोंगरात किंवा डोंगरातून जाणाऱ्या रस्त्याने सिगारेट ओढू नका. कोणत्याही कारणाने आग लावण्याचा प्रयत्न करू नका. अशा सूचना वन विभागाने दिल्या आहेत.

शिवरायांचा आदर्श घेऊन राष्ट्रविकासासाठी कार्य करूया : आ. किरणराव सरनाईक

■ महासागर प्रतिनिधी,

वाशीम, दि. २० : आजच्या नवयुवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेत शिक्षण, राष्ट्रविकास आणि समाजसेवेत पुढे यावे. केवळ पुस्तकी शिक्षण नव्हे, तर स्वावलंबन, नेतृत्वगुण आणि शिस्त यांचे पालन करून समाजासाठी योगदान देणे महत्त्वाचे आहे. शिवरायांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपले कार्य अधिक प्रभावी करण्याचा संकल्प केला पाहिजे. शिवरायांचा आदर्श घेऊन शिक्षण व राष्ट्रविकासासाठी कार्य करूया असे प्रतिपादन आ. किरणराव सरनाईक यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित जय शिवाजी, जय भारत पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित कार्यक्रमात अमरावती शिक्षक मतदारसंघाचे आमदार किरणराव सरनाईक अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत तसेच शिवजयंती उत्सव समितीचे

पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. आ.किरणराव सरनाईक यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून जय शिवाजी जय भारत पदयात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मार्गस्थ होऊन बाकलीवाल विद्यालय, रिसोड नाका, पाटणी चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी समारोप झाला. यावेळी आ. किरणराव सरनाईक यांनी शिवरायांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत, तरुणांनी त्यांचा आदर्श घ्यावा आणि समाजासाठी सकारात्मक योगदान द्यावे, असे आवाहन केले. आयोजकांनीही छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची महती सांगत, समाजात एकता आणि राष्ट्रप्रेमाचे बळ वाढावे, हा या पदयात्रेचा उद्देश असल्याचे सांगितले. या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी पदयात्रेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची आठवण करून देत उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. आयोजकांनी या उपक्रमाचा उद्देश स्पष्ट करत, शिवचरित्र जागर करण्यावर भर दिला. संचालन प्रा.गजानन वाघ तर आभार शाहु भगत यांनी मानले. याव्ेळी अनेक मान्यवर मंडळी उपस्थिती होती.

कै. कोंडबा तात्या ढवळे विद्यालयात शिवजयंती

शिरपूर येथील कै. कोंडबा तात्या ढवळे विद्यालय व श्री संत ओंकारगीर बाबा कनिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अनंत देशमुख व प्रमुख पाहुणे ओहेकर मॅडम, विश्वंभर मॅडम, प्रशांत जाधव हे होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करण्यात आला.

संदिप वाळले व प्राध्यापक शरद ढवळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकलेश बेंडवाले यांनी केले. तर आभार प्रा. सचिन भालेराव यांनी मानले.

जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांच्या जीवनावर नाट्य, पोवाडे, वेशभुषा, लेझीम, लाठीकाठी, दांडपट्टा सादरीकरणाने शिवरायांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

या पदयात्रेने उपस्थितांच्या मनात शिवचरित्राचा उजाळा दिला गेला.नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याने वातावरण शिवमय झाले होते. युवक, महिला, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी, शालेय विद्यार्थी, एनसीसी विद्यार्थी, स्काऊट गाईड मोठ्या संख्येने यात सहभाग घेतला. आयोजकांनी या उपक्रमाचा उद्देश स्पष्ट करत, शिवचरित्र जागर करण्यावर भर दिला.

जय शिवाजी जय भारत पदयात्रेने दुमदुमली नगरी

वर्धा : रयतेचे राजे छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून जय शिवाजी जय भारत पदयात्रेचा शुभारंभ सर्कस मैदान रामनगर येथून पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. आकर्षक वेशभूषा, ढोल ताशांचा गजर, जय शिवाजी, जय भवानी च्या घोषणा व नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने वर्धा नगरी दुमदुमली. शिवाजी महाराजांचे विचार आजच्या तरूण पिढीमध्ये रुजविण्यासाठी जगभरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहाने साजरी करण्यात येत आहे. शिवरायांचे कार्य देशातच नव्हे तर जगाने स्विकारले आहे, असे मनोगत जय शिवाजी जय भारत पदयात्रेचा शुभारंभप्रसंगी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केले. पदयात्रेच्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी वान्मथी सी. अपर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, परिविक्षाधिन जिल्हाधिकारी रेवैया डोंगरे, अतिरिक्त सीईओ सुरज गोहाड, न.प. चे माजी उपाध्यक्ष प्रदीपसिंह ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी शिवराज पडोळे, जिल्हा क्रिडा अधिकारी आशा मेश्राम यांच्यासह उपस्थित होते. यावेळी संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. पदयात्रेच्या प्रारंभी एक पेड माँ के नाम संकल्पनेनुसार मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. पदयात्रेचा समारोप सर्कस मैदान येथे करण्यात आला. समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांनी पारंपारिक खेळांचे प्रात्याक्षिक केले. युथ आयकॉन उज्वल ठाकरे, सारंग रघाटाटे, साहिल दरणे, गुरूप्रसाद साठोणे, प्रतिक पवार यांचा सत्कार केला. प्रास्ताविक आशा मेश्राम यांनी, संचालन ज्योती भगत यांनी केले. तर आभार शिक्षणाधिकारी डॉ. नितू गावंडे यांनी मानले.

छत्रपती शिवरायांतील सद्गुण संत विचारांच्या प्रभावाचा परिपाक : तुषार उमाळे

दिग्रस: छत्रपती शिवराय जगातील असा एकमेव राजा आहे ज्यांनी परस्त्रीला मातेसमान मानले. मध्य युगात गुलाम व स्त्रीयांचे जे बाजार भरत होते ते बंद केले. स्त्रियांचे शील भंग करणाऱ्यास मृत्यूदंडासारखी कठोर शिक्षा दिली. शेतकऱ्यांना त्रास होऊ म्हणून मावळ्यांना शेतमाल बळजबरीने नव्हे, तर मोबदला देऊन खरेदी करण्याची ताकीद दिली, इतके सारे आदर्श मध्ययुगामधे शिवरायांनी स्वराज्यात कायद्याने लागू केले व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी सुद्धा केली. हे सर्व सदकार्य व सद्गुण म्हणजे त्यांच्यावर असलेल्या संत विचारांच्या प्रभावाचा परिपाक होय, असे मत वक्ता व संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक तुषार उमाळे यांनी व्यक्त केले. दिग्रस येथे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने शिवरायांवरील संतविचारांचा प्रभाव या विषयावर ते जिजाऊ सांस्कृतिक भवनात व्याख्यान देतांना बोलत होते. यवतमाळ-वाशीमचेखासदार संजय देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. दिनबाई शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. अभय पाटील, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अॅड. रवी तुपसुंदरे, पोलिस उपनिरीक्षक राजेश लाखकर, छबु इंगोले, शुभदा पाटील, प्रा. डॉ. अपर्णा पाटील, जिल्हा नियोजन समिती सदस्य सुधीर देशमुख आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी प्रा. मधुकर वाघमारे, उत्तम मनवर, ड. विक्रम शिंदे, सदानंद आठवले, विजय पाटील, विजय घाटे, प्रा. मतीन खान, संजय तिवडकर, दिगांबर ठाकरे, सतिश महल्ले, सुनिल लबडे, ओंकार ठाकरे, ड. रवींद्र गावंडे, अंकुश घाडगे, राजू ठाकरे, अशोक तायडे, मजहर अहेमद खान, दत्ता ठाकरे, गुलाब तायडे, संजय इंगोले, संजय कदम, दिनेश चौधरी, पुरूषोत्तम कुडवे, लक्ष्मण टेकाडे, अब्दुल रफीक शेख, अजय वानखडे, वंदना इहरे, राज्यश्री देशमुख, पुष्पा ठाकरे, वनमाला गावंडे, पुष्पा देशमुख, लक्ष्मी कलोसे, जोशना काळे, अलका वाघमारे, सीमा शिंदे, मनीषा कदम, प्रीती ठाकरे, अनिता वानखडे, अर्चना फाळके, संध्या साबळेसह शहरातील सर्वधर्मीय व सर्वपक्षीय बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

शिवजयंती महोत्सव समितीच्यावतिने कार्यक्रम



उमरखेड: शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने मागील दोन दिवसांपासून विविध कार्यक्रमाचे आयोजन येथील नगर पालिका खुले नाट्यगृहात करण्यात आले आहे. सोमवारी दि. १७ फेब्रुवारीला रात्री एमजे म्युझिकल ग्रुप नांदेड यांच्या शिवगीत व देशभक्तीपर गायनाच्या कार्यक्रमाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून सोडले. दोनच राजे इथे गाजले, कोकण पुण्यभुमीवर! एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर या गाण्याने अक्षरशः श्रोत्यांच्या अंगावर काटे उभे राहिले होते. महेश जैन यांनी सादर केलेल्या या गिताने श्रोत्यांची वाहवा मिळविली. दुनिया मे कही मिल जाए आशिक ! पर वतन हसी सनम नही होती ! हिरो मे समेट कर मरते है सभी । तिरंगे से सही कफन नही होता ! या शायरीसह अंजली भोसले यांनी सादर केलेल्या मेरा कर्मा तू मेरा धर्मा तु ! हर करम अपना करेंगे ऐ वतन तेरे लिए । दिल दिया है जान भी देंगे ए वतन तेरे लिए । यासह माजी सैनिक सिद्धार्थ मुनेश्वर यांनी आपल्या पहाडी आवाजात जहाँ डाल डाल पर सोने की चिडिया करती है बसेरा वो भारत देश है मेरा ! हे गित सादर करून रसिकांची मने जिंकली यासह अनेक देशभक्तीपर गित यावेळी सादर करून शेवटी प्रजापती भिसे यांनी पोवाडा सादर करून शहरवासीयांना मंत्रमुग्ध केले.या वेळी तालुक्यातील सर्व माजी सैनिकांना, सामाजिक संघटनांना, पत्रकारांना शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने गौरविण्यात आले. यावेळी आमदार किसन वानखेडे, नितिन भुतडा, माजी आमदार विजय खडसे, उपविभागीय अधिकारी हनुमंत गायकवाड, राजू जयस्वाल, डॉ. अंकूश देवसरकर, आशा देवसरकर, सविता कदम आदी उपस्थित होते.

जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषाने शिवजयंती उत्साहात



बाभुळगाव : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती बुधवारी दि. १४ फेब्रुवारीला मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बाभुळगाव शहर शिवसेनेच्या वतीने आयोजित शिवजयंती उत्सवात स्थानिक शिवकला मर्दानी खेळ असोसिएशनच्या खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यावेळी शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये महिला खेळाडूंनी पारंपरिक मराठी वेशभूषा केली होती. या प्रसंगी शिवकालीन खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. मिरवणुकीतील जय भवानी जय शिवाजीच्या जयघोषाने बाभूळगावनगरी दुमदुमली होती. येथील शिवछत्रपती चौकातील शिवाजी उद्यानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मिरवणूक तहसील कार्यालयात पोहचली. तेथे तहसीलदार मीरा पागोरे यांनी उपस्थितांना संबोधित केले. यावेळी नायब तहसीलदार दिलीप बदकी, गुरुदेव सेवा मंडळाचे जिल्हा सेवाधिकारी पद्माकर ठाकरे उपस्थित होते. मिरवणुकीत शिवसेना शहर प्रमुख प्रवीण लांजेकर, भाजप शहर अध्यक्ष नगरसेवक अनिकेत पोहोकार, नगरसेवक अमर सिरसाठ, अभय तातेड, चंद्रशेखर परचाके, माजी उपनगराध्यक्ष रवींद्र काळे, मर्दानी खेळ असोसिएशनचे मयूर शर्मा, प्रीतम सोनोने, विक्रम बऱ्हाणपूरे, योगेश वानोडे, नंदू लांडे, सचिन मालखेडे, हेमराज शिंदे, पिंटू काळे, नितीन टोने, संजय शिरपूरकर, दिनेश रोकडे, विवेक बुरेवार, जितेश ठाकरे, हरीश भूराने, गजानन कोठेकर, मोहन कुकडे आदी शिवसैनिकांसह, महिला मंडळ, युवक, युवती, तथा शहरातील नागरिक सहभागी झाले होते.

छत्रपती शिवरायांना दिली अनोखी मानवंदना



परतवाडा: रयतेचे राजे, हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र ग्राम दर्पण कार्यालय येथे मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध देशमुख यांच्याहस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. याप्रसंगी चंद्रशेखर देवडे, प्रदीप निचडे, हर्षरत्न पाते, सुमित जनबंधू, सोनाली पुंडकर, सोनाली बदरके, कविता देशमुख, दर्शना पाटील, पूजा जाधव, साक्षी भोंगे, नेहा पंत, शुभांगी राऊत, प्रतीक्षा धसकट, कार्तिक चराटे, ऋषिकेश ढेपे आदींची उपस्थिती होती. यावेळी ऋषिकेश ढेपे यांनी शिवगर्जना करीत शिवरायांना अनोखी मानवंदना दिली. यावेळी सर्व कर्मचाऱ्यांनी एकच जयघोष केला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध देशमुख यांनी शिवरायांना अभिवादन केले. छत्रपती

शिवफेरीतील नागरिकांसाठी २०० किलो भज्यांचे वितरण

अमरावती : अमरावती जिल्हा परिषदेच्या लिपीक वर्गीय कर्मचारी संघटना आणि कर्मचारी युनियनने एक वेगळा उपक्रम राबवला. शिवजयंतीनिमित्त शिवफेरीत सहभागी झालेल्या नागरिक आणि पादचाऱ्यांसाठी त्यांनी सायंस्कोर मैदानाच्या प्रवेशद्वाराजवळ भज्यांचे मोफत वितरण केले. सकाळी ११.३०. पासून दुपारी २.३०. पर्यंत हा कार्यक्रम सुरू होता. स्टॉलमध्येच ताजे भजी तळून ते लगेच वितरित करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस यांच्या हस्ते भजी वितरणाचा शुभारंभ करण्यात आला. २०१२ पासून छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त अल्पोहार वाटपाची ही परंपरा सुरू आहे. दरवर्षी वेगवेगळे पदार्थ वितरित केले जातात. यंदा २ क्विंटल बेसनाचे भजी तयार करून वाटण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघटनांचे जिल्हाध्यक्ष पंकज गुल्हाने, सचिव संजय राठी, कोषाध्यक्ष श्रीकांत मेश्राम यांच्यासह संपूर्ण कार्यकारिणीने योगदान दिले. संयोजक किरण खांडेकर, प्रसिद्धी प्रमुख हेमंत यावले, जि.प. शिक्षक सहकारी बँकेचे संचालक विजय कोठाळे यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. नितीन माहोरे, बाळासाहेब मोथरकर, विजय कविटकर, मंगेश मानकर, निलेश तालन, संजय येऊतकर, दीपाली पडोळे, अपर्णा आत्राम, ज्योती गावंडे, दिनेश राऊत, योगेश वानखडे, योगेश मालवीय आणि अभिजित कोल्हे यांनीही कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात सहभाग घेतला.

स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती

सिंदखेडराजा: स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त आज बुधवारी राजवाडा परिसरात सकाळी अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शासनाच्या सूचनेवरून स्थानिक प्रशासनाने आवाहन केल्यानुसार शहरात सकाळी पद यात्रा व शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. शहरात देखील स्थानिक प्रशासनाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बुधवारी सकाळी४ वाजता राजवाडा परिसर शालेय विद्यार्थी, नागरिक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी फुलून गेला होता.

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

e-Tender Notice

Super scribed and sealed offers in Two Bid System are invited from reputed Firms/Contractors/ Agencies for work of Empanelment of Regular Agencies & New Agencies for Repairing of various capacities up to100 kVA failed Distribution Transformers in Nagpur Urban Circle Nagpur Zone & Empanelment of Regular Agencies & New agencies for Repairing of various capacities above100 KVA failed Distribution Transformers in Nagpur Urban Circle Nagpur Zone for FY-2025-26 having tender no.**(1)SE/NUC/TFRP/TECH/2024-25/T-13,(2)SE/NUC/TFRP/TECH/2024-25/T-14,(3)SE/NUC/TFRP/TECH/2024-25/T-15 & (4) SE/NUC/TFRP/TECH/2024-25/T-16** The Tender details/documents for above Tender are available on website url **etender.mahadiscom.in/eat App.** The Tender documents can be downloaded from aforesaid website from **Dt:-21.02.2025.** Submit each tender duly filled in on or before **Dt.05.03.2025,15.00 hrs.**

NZ/PR No. 35 **Superintending Engineer**
Dt. 20.02.2025 **Nagpur Urban Circle, MSEDCL, Nagpur**

Public Notice

If is hereby informed of the public at large that **EJAJ AHEMAD S/O AHEMAD**, Owner of the four wheeler vehicle **(MH-31 -EA-5170 (MARUTI ALTO)) Engine No - F8DN4884506 and Chasis No. - MA3EAA61S021-02002GC** has Expired on **03-04-2024,** Smt. FIROZ AKHTER W/O EJAZ AHEMAD, **Add**-Plot no 13, Basera, Jaihind Nagar, Mankapur, Nagpur - 440030 has been succeeded by **EJAJ AHEMAD S/O AHEMAD**, and he is resident of Plot no 13, Basera, Jaihind Nagar, Mankapur, Nagpur - 440030, Maharashtra. She being the successor of possession of above mentioned vehicle to confer intent to use the vehicle accordingly, he has applied to RTO authority /Regional transport office Nagpur (East) for the transfer of vchicle on his name any person having any claim or objective in thos regara should inform within 7 days from the date of publication of this notice and bring such fact to that notice of RTO /Transport authority.

Name of Successor
FIROZ AKHTER EJAZ AHEMAD
Plot no 13, Basera, Jaihind Nagar, Mankapur,
Nagpur - 440030, Maharashtra
9595878537

चौकशीची जाहीर नोटीस

मा. कोर्ट विधमान सहाय्यक धर्मादाय आयुक्त -२, नागपूर यांचे न्यायालय

चौकशी क्रमांक ५७१/२०२४
कलम २२ (३ए)

जा. क्र ACC २/१५८९/२०
सार्वजनिक न्यास नोंदणी का
सिबिल लाईन्स नागपूर -०१
दिनांक १८/०२/२०२५

सर्वधर्म चारिटेबल ट्रस्ट नागपूर नोंदणी क्र. ई-२३९५ (ना) चे बाबत मुंबई सार्व विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ (३ए) नुसारचा अर्ज

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेला सुचित करण्यात येते की सर्वधर्म चारिटेबल ट्रस्ट नागपूर क्रमांक ई-२३९४ (ना.) या न्यासासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० २२(३ए) अन्वये या न्यायालयात अर्जदार डॉक्टर संदीप देवानंद मेश्राम व ७ यांनी दिनांक १८ २०२४ रोजी नोंदणी रद्द बाबत अर्ज दाखल केला आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेच त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाण तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौक केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सही निशी व माननीय सहायक धर्मादाय आयुक्त नागपूर यांचे शिक्क्यानिशी आज १८/२/२०२५ रोजी दिली

(शिक्का)

अधीक्षक (न्यास भाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी का
नागपूर विभाग नागपूर

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

ओंकारा सेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

कॉर्पोरेट ऑफिस: कोहिनूर स्क्वेअर, ४७ वा मजला, एन.सी. केळकर मार्ग, आर.जी. गडकरी चौक, दादर पश्चिम, मुंबई - ४०००२८. संपर्क क्रमांक - ९७७३४०६१७५.

स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना
नियम ८ (६) नियम ९(१) सह वाचण्याची तरतूद पहा

सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ९(१) सह वाचलेल्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह वाचलेल्या आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार एम/एस यांना सूचना देण्यात येत आहे. खोडके ऍग्रो एनर्जी, आणि सह-कर्जदार/जामीनदार/भागीदार श्री. प्रशांत विनायकराव खोडके, श्रीमती. सुचिता प्रवीण खोडके आणि श्रीमती मीना रणजीत जगताप आणि श्री. मिलिंद चंद्रकांत खोडके (पाटील) आणि श्रीमती. सीमा प्रशांत खोडके आणि मे. विदर्भ शुगर मिल लि आणि मे. खोडके ग्रो प्रॉडक्ट्स प्रा. लि आणि मे. खोडके ग्रो प्रॉडक्ट्स प्रा.लि खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता तारण/सुरक्षित कर्जदाराकडे आकारली आहे, आणि ज्याचा प्रत्यक्ष ताबा नागपूर नागरी सहकारी बँक लिमिटेड (एनएनएसबी) ने घेतला आहे पीएस ४७/२०२१-२२ ट्रस्टच्या विश्वस्ताच्या क्षमतेनुसार कार्य करणाऱ्या ओएआरपीएलच्या च्या बाजूने अंतर्निहित सिक्युरिटीज आणि त्यांचे सर्व अधिकार आणि अधिकार यासह उक्त कर्जदार आणि गहाण जामीनदार यांच्यावर पडलेली आर्थिक मालमत्ता/संपूर्ण थकबाकी कर्ज पूर्णपणे नियुक्त आणि हस्तांतरित केले आहे. खाली नमूद केलेली मालमत्ता १३.०३.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जशी आहे तशी, जशी आहे तशी, आणि जे काही आहे वर विकली जाईल (बिड सबमिट करण्याची अंतिम तारीख आणि वेळ १२.०३.२०२५ संध्याकाळी ६.०० पर्यंत आहे), रु. ७,१९,८८,७५१.००/- (रुपये सात कोटी एकोणीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार सातशे एकावन्न फक्त) च्या वसुलीसाठी १ मार्च २०१५ रोजी, तसेच आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इत्यादींसह कराराच्या दरावर जमा झालेले व्याज/अवास्तव व्याज आकारले जाईल

ओंकारा सेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओंकारा पीएस ४७/२०२१-२२ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे) ने २१.०३.२०२२ च्या असाइनमेंट कराराद्वारे संबंधित कर्जदार/जामीनदारांविरुद्ध असलेली संपूर्ण थकबाकी कर्जेसामुदायिक नागपूर नागरी सहकारी बँक ली. (एनएनएसबी) बँकेकडून सुरक्षा अंतर्गत प्राप्त केली आहेत. त्यामुळे, ओंकारा सेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड ने नागपूर नागरी सहकारी बँक लिमिटेड (एनएनएसबी) च्या शूजमध्ये पाऊल टाकले आहे आणि संपूर्ण थकबाकी वसूल करण्यासाठी आणि सिक्युरिटीजची अंमलबजावणी करण्यासाठी ती पात्र झाली आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत, बयाणा ठेव आणि ज्ञात भार (असल्यास) खालीलप्रमाणे आहेत:

मालमत्तेचे वर्णन	
५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ आणि १३ या दुकानाचे सर्व तुकडा आणि पार्सल एकूण बांधलेले क्षेत्रफळ १५९९.२३ चौ. फूट (१४८.५७ चौ. मीटर.) आणि बाल्कनी ४७६.१७ चौ. फूट. असे एकूण बिल्ट अप एरिया २०७५.४० चौ. फूट. असे एकूण तयार केलेले क्षेत्रफळ २०७५.४० चौ. फूट. (१९२.८८ चौ. मीटर) नाझुल प्लॉट क्रमांक ८ वर बांधण्यात आलेल्या व्यावसायिक संकुलातील दुसऱ्या मजल्यावर, पत्रक क्र. ४८-ब, मौजे- गावठाण अमरावती, प्रगणे-बडनेरा ता. आणि जि. अमरावती, उपनिबंधक अमरावती यांच्या कार्यकक्षेत आणि अमरावती शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील, नगरपालिकेची मालमत्ता क्रमांक ७७१, प्रभाग क्रमांक ३२ मध्ये, श्रीमती यांच्या नावे. सुचिता प्रवीण खोडके आणि आंबट सीमा प्रशांत खोडके आणि सांगितलेली दुकाने सामान्यतः खालीलप्रमाणे आहेत: - पूर्वेकडे: पॅसेजच्या दिशेने पश्चिम: पॅसेज आणि पायऱ्यांच्या दिशेने उत्तर: पॅसेजच्या दिशेने उत्तर: मार्गाने	
राखीव किंमत: रु. ९०,००,०००/-	ईएमडी: रु. ९,००,०००/-
ई-लिलावाची तारीख १३.०३.२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० पर्यंत	
किमान बोली वाढीची रक्कम रु. ४०,०००/- (केवळ चाळीस हजार)	
सहभागाचे बोली पत्र/केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: १२.०३.२०२५ संध्याकाळी ६:०० वा.	
तपासणीची तारीख ०३.०३.२०२५ दुपारी ०१.०० ते ०४.०० दरम्यान	
ज्ञात दायित्वे ज्ञात नाहीत	

हे प्रकाशन सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या ९(१) सह वाचलेल्या नियम ८ (६) अंतर्गत कर्जदार/सह-कर्जदारांना पंधरा दिवसांची नोटीस देखील आहे.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी कृपया सुरक्षित कर्जदाराच्या वेबसाइटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या म्हणजे,http://omkaraarc.com/auction.php.आणि अधिकृत अधिकारी प्रतीक्षा पटेल यांचे संपर्क तपशील (संपर्क क्रमांक ९७७३४०६१७५ आणि राजेंद्र देवर्डे-९३२४५४६६५१ आणि ईमेल-pratiksha.patel@omkararc.com बोलीदार http://www.bankeauction.com या वेबसाइटला देखील भेट देऊ शकतात किंवा सेवा प्रदात्याशी संपर्क साधा एम/एस सी १ इंडिया प्रा. लिमिटेड, दूरध्वनी हेल्पलाइन: +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी: support@bankeauctions.com, श्री भाविक पंड्या, मोबाईल: ८८६६६ ८२९३७ ईमेल-Maharashtra@c1india.com. दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता २०१६ च्या कलम २९अ अंतर्गत इच्छुक बोलीदारांनी त्याचे पालन केले पाहिजे आणि घोषणा द्यावी

स्वा/-
अधिकृत अधिकारी,
ओंकारा सेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
(ओंकारा पीएस ४७/२०२१-२२ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून त्याच्या क्षमतेनुसार काम करत आहे)

तारीख: २१.०२.२०२५
ठिकाण: अमरावती